# (६) नातेसंबंध

१) हेमंत, सुमनचा भाऊ गणेशच्या एकुलत्या एक बहिणीच्या वडिलांचा शालकम (साला/मेहुणा) आहे. तर सुमनचे हेमंतशी नाते काय ?

१) भाची २) मामी ३) आजी ४) आई

२) c आणि a या बहिणी आहेत. a ही b ची आई आहे. r हा b चा मुलगा आहे. d हा c चा मुलगा आहे. तर पुढीलपैकी कोणते विधान निश्चित बरोबर आहे ?

१) b व d हे चुलतभाऊ आहेत. २) b व d हे मावसभाऊ आहेत.
३) या गटात फक्त २ स्त्रिया आहेत. ४) एकही विधान निश्चितपणे खरे मानता येत नाही.

३) नीताची मुलगी सुनीलच्या मुलाची आतेबहीण आहे, तर सुनील नीताचा कोण ? ✻

१) आतेभाऊ २) पुतण्या ३) मावसभाऊ ४) भाचा

४) निमा नेहमी म्हणते की '' आमच्या कुटुंबात आजे सासऱ्यांच्या काळापासून कुटुंबात मुलगा–मुलगी यांचे प्रमाण समान आहे. शिवाय प्रत्येक जोडप्याला मुले दोनच''. आताच एका मुलीकडे निर्देश करत ती म्हणाली '' ती माझ्या मुलाच्या वडिलांकडून असलेल्या आजीच्या मुलीची मुलगी आहे.'' तर या मुलीच्या मुलीशी निमाचे नाते काय आहे ?

१) मामी २) भाची ३) आत्या ४) काकी

५) धनंजयच्या आईची नणंद रामची आई आहे तर धनंजयची आई रामची कोण ?

१) मामी २) मावशी ३) काकू ४) आत्या

६) सासरे व जावई दोघे जेवायला बसले. मायलेकी वाढत होत्या माय म्हणजे, ''माझ्या बाबा तू खा'' मुलगी म्हणते 'माझ्या बाबा तू खा' तर सासरा असलेल्या व्यक्तीचे लेक असलेल्या व्यक्तीशी काय नाते होईल ?

१) पती २) वडीलांचे वडील ३) आईचे वडील ४) वडील

७) माधुरीची आई मीनाची आत्या लागते तर मीनाची आई ही माधुरीच्या आईची कोण ?

१) आत्या २) बहीण ३) नणंद ४) वहिनी

८) सोबतच्या व्यक्तीची ओळख करून देताना बमन मला म्हणाला की त्याचे वडील हे त्याच्या आजीचा तिसरा मुलगा आहेत. त्या व्यक्तीच्या वडिलांचे बमनशी नाते सांगणारा/सांगणारे सर्वात तर्कसंगत पर्याय निवडा.

१) फक्त काका २) काका किंवा वडील
३) मामा किंवा काका किंवा वडील ४) मामा किंवा वडील

९) अ हा ब चा मुलगा आहे, ब ची बहिण क हिला ड नावाचा मुलगा आणि म नावाची मुलगी आहे. स हे ड चे मामा आहेत. तर स हा अ चा कोण ?

१) पुतण्या २) काका ३) मामा ४) आजोबा

१०) धनंजयच्या आईची नणंद रामची आई आहे तर धनंजयची आई रामची कोण ?

१) मामी २) मावशी ३) काकू ४) आत्या

११) माधुरीची आई मीनाची आत्या लागते तर मीनाची आई ही माधुरीच्या आईची कोण ?
१) आत्या २) बहीण ३) नणंद ४) वहिनी

१२) सासरे व जावई दोघे जेवायला बसले. मायलेकी वाढत होत्या माय म्हणजे, ''माझ्या बाबा तू खा'' मुलगी म्हणते 'माझ्या बाबा तू खा' तर सासरा असलेल्या व्यक्तीचे लेक असलेल्या व्यक्तीशी काय नाते होईल ?
१) पती २) वडीलांचे वडील ३) आईचे वडील ४) वडील

१३) अपर्णाला २ बहिणी व १ भाऊ आहे. अजयला ३ भाऊ व दोन बहिणी आहेत. रंजना ही अजयची बहीण असून विजय हा अपर्णाचा भाऊ आहे, तर पुढीलपैकी कोणाला सर्वांत जास्त बहिणी आहेत ?
१) रंजना २) अपर्णा ३) विजय ४) अजय

१४) शरदच्या आत्याची वहिनी श्रीधरची आई आहे, तर शरदचे वडील श्रीधरचे कोण आहेत ?
१) काका २) वडील ३) चुलतभाऊ ४) मामा

## उत्तरे : (६) नातेसंबंध

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १–x | २–२ | ३–४ | ४–१ | ५–१ | ६–४ | ७–४ | ८–३ | ९–४ | १०–१ |
| ११–४ | १२–४ | १३–३ | १४–२ | | | | | | |